स्थायी समितीची विशेष सभा सोमवार दि. 03.03.2014 रोजी सकाळी 10.00 वाजता नागपूर महानगरपालिकेच्या सिव्हील कार्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचे कार्यवृत्त.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सदस्य |
| 2. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 3. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 5. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 6. | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | सदस्य |
| 7. | सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 8. | सौ. संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 9. | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | सदस्या |
| 10. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 11. | सौ. रविंदर कौर बावा | सदस्या |

## अनुपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| 1. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 2. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 3. | सौ. सिंधु रामा उईके | सदस्या |
| 4. | श्री. देवा प्रसाद उसरे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री.हेमंतकुमार पवार, अति.आयुक्त
2. श्री.हरीश दुबे, निगम सचिव

पिठासीन अधिकारीः– आजच्या सभेची कार्यवाही सुरू होण्याचे अगोदर सर्वप्रथम उपस्थित स्थायी समितीच्या सदस्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. मुंबई प्रान्तिक अधिनियम 1949 (सुधारणा) व नागपूर शहर महापालिका अधिनियम 1948(निरसन) 2011(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012) मधील कलम 20(3) अन्वये स्थायी समितीच्या दिनांक 15.02. 2013 रोजी ठराव क्रमांक 79 अन्वये झालेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने स्थायी समितीकरिता वर्ष

2014—15 करिता कायम राहिलेले आठ(8) मा.सदस्य आणि महानगरपालिका ठराव क्रमांक 212 दिनांक 18.02.2014 अन्वये नियुक्त करण्यात आलेले सात (7) मा.सदस्य असे एकुण 15 मा.सदस्यांमधून एकाची स्थायी समितीचे सभापती पदाकरिता निवड करावयाची आहे. ही निवड महाराष्ट्र शासनाने दिनांक 17 फेब्रुवारी 2007 रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार करावयाची आहे.

<u>ठराव क्रमांक 1</u>ः— सन 2014—15 करिता स्थायी समितीच्या सभापतीची निवड करणे.

पिठासीन अधिकारीः— स्थायी समितीच्या सभापतीची निवड करण्याकरिता निगम सचिव यांनी त्यांच्याकडे सभापती पदासाठी प्राप्त झालेली नामनिर्देशन पत्रे माझेकडे द्यावी.

(यावेळी निगम सचिव यांनी सभापती पदाकरिता प्राप्त झालेली ( 3 ) नामनिर्देशन पत्रे पीठासीन अधिकारी यांना सादर केली)

पिठासीन अधिकारी ः— निगम सचिवामार्फत त्यांचेकडे प्राप्त झालेले एकुण ( 3 ) नामनिर्देशन पत्रे माझेकडे दिली. नामनिर्देशन पत्राची छाननी केली असता एकूण ( 3 ) नामनिर्देशन पत्रे वैध आढळली. वैध नामनिर्देशन पत्रानुसार एकूण ( 3 ) उमेदवार होतात. त्यांची नांवे मी वाचून दाखवितो.

| अ. क्र. | नामनिर्देशित उमेदवारांचे नांव | अनुमोदकाचे नांव | सुचकांचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सौ. विद्या राजेश कन्हेरे |
| 2 | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | श्रीमती इशरद नाहीद मो. जलील अंसारी | श्री.राजेश श्रावण घोडपागे |
| 3 | श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर | सौ. विषया विकास खोब्रागडे | सौ. संगिता दिपक गिऱ्हे |

पिठासीन अधिकारीः— उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी 15 मिनिटाचा अवधी देण्यांत येत आहे. ज्यांना उमेदवारी परत घ्यावयाची आहे. त्यांनी माझेकडे लेखी अर्ज सादर करावा.

(यावेळी उमेदवारी अर्ज परत घेण्यासाठी 15 मिनिटाचा अवधी देण्यात आला)

पिठासीन अधिकारीः— मा.सदस्यगण, नामनिर्देशन पत्रे प्राप्त झाली असून ती तिन्ही **श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर** यांची आहेत. दिलेल्या अवधीत **श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर** यांनी नामनिर्देशन पत्रे मागे न घेतल्यामुळे ते एकमेव उमेदवार उरतात. त्यामुळे **श्री. नरेन्द्र उर्फ बाल्या गोंविदराव बोरकर** हे स्थायी समिती सभापती म्हणून बिनविरोध निवडुन आल्याचे मी घोषित करतो.

<u>ठराव क्रमांक 2</u>ः— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. तसेच आजची सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यात येते.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

पिठासीन अधिकारी